# यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान

-----------------------------------------------------------------

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे योगदान मोठे आहे. राज्यामधील विकासाच्या सर्व योजना पंचायत राज संस्थांमार्फत राबविल्या जातात. तेव्हा पंचायत राज संस्थांच्या कामगिरीनुसार त्यांना प्रोत्साहित करुन त्यांची कार्यसंस्कृती वाढविणे आवश्यक आहे. यासाठी राज्यात पंचायत राज संस्थांमधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांसाठी सन 2005-2006 या आर्थिक वर्षापासून विभाग व राज्य अशा दोन्ही स्तरांवर "यशवंत पंचायत राज अभियान" ही पुरस्कार योजना सुरु करण्यात आली आहे. यानुसार, कोल्हापूर जिल्हा परिषदेस खालील पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं | वर्ष | शेरा |
|---|---|---|
| 1 | 2022-23 | व्दितीय क्रमांक प्राप्त |
| 2 | 2020-21 | प्रथम क्रमांक प्राप्त |
| 3 | 2018-19 | व्दितीय क्रमांक प्राप्त |

समृद्ध ग्राम, संपन्न ग्रामस्थांची संकल्पना प्रत्यक्षात आणताना संस्थांनी केलेली कामगिरी लक्षात घेऊन व त्यांच्या मध्ये स्पर्धेचे वातावरण तयार करून अत्युत्कृष्ट काम करणाऱ्या पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदा या पंचायत राज संस्थांना आणि त्यातील गुणवंत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीचा सन्मान करण्यासाठी यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान राबविण्याचे शासनाच्या विचारधीन होते. त्या अनुषंगाने "यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान" योजनेअंतर्गत पंचायत समित्या व जिल्हा परिषदांना पुरस्कार प्रदान करण्यात येतात.